**<u>रे.मु.नं.११२/२०१८</u>**

**<u>नि.क्र.१३६</u>**

**<u>नि.क्र. १३८ च्या आदेशान्वये प्रतिवादी क्र ३ चा उलटतपास प्रतिवादी क्र ४ ते १० तर्फे विधीज्ञ श्री. वाबळे यांचेतर्फे शपथेवर सुरु.</u>**

सध्याला गट क्र. १३४ मधील सुमनबाईच्या क्षेत्रामध्ये शेडचे काम सुरु असल्याचे दिसून येते. हे शेडचे काम कोण करत आहे हे मला सांगता येणार नाही. सुमनबाईच्या क्षेत्रामध्ये कचरु मुरलीधर कणसे म्हणजेच प्रतिवादी क्र १ हे वहिवाट करत आहे. (हे उत्तर देताना साक्षीदार स्वतः सांगतो की, या मिळकतीचा सातबारा सुमनबाईच्या मुलीच्या नावे आहे.) असे होवू शकते की, हे शेड कचरु मुरलीधर कणसे बांधत असतील. भागूबाईच्या मृत्युनंतर फेरफार क्र. २५५० अन्वये तिच्या वारसांची नोंद महसूल सदरी झाली. हा फेरफार कुणीही आव्हानीत केलेला नाही व तो तसाच आहे. गंगुबाई यांच्या मृत्यूनंतर फेरफार क्र.२६११ अनव्ये त्यांच्या वारसांच्या नोंदी दावा मिळकतीच्या महसूल सदरी झालेल्या आहेत. हा फेरफार अदयापपर्यंत कुणीही आव्हानीत केलेला नाही.

प्रश्न – तुमच्या वडीलांनी भागीरथीबाईशी सोबत १९५५ च्या आधी लग्न केले ?

उत्तर – माझा जन्म १९६४ सालचा असल्याकारणाने मला याबाबतचा कल्पना नाही.

हे म्हणणे खोटे आहे की, प्रतिवादी क्र ४ ते १० यांना दावा मिळकतीमध्ये हिस्सा मिळू नये म्हणून मी माझ्या जबाबामध्ये खोटी कथने केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया कैफियतीच्या आधारे खोटे शपथपत्र देवून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/–

दिनांक –३०.०८.२०२४

(विनय बी.कांबळे)

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

श्रीरामपुर